स्थायी समितीच्या सोमवार दिनांक 10–09–2012 रोजी दुपारी 12–30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. तिवारी दयाशंकर चंन्द्रशेखर | अध्यक्ष |
| 2. | श्री. सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 3. | सौ. बहादुरे सरोज राजु | सदस्या |
| 4. | श्री. फुके परिणय रमेश | सदस्य |
| 5. | श्री. खान असलमखां रशीद खान | सदस्य |
| 6. | श्री. डोळस रविंद्र गोविंदराव | सदस्य |
| 7. | श्री. राजू ज्योतीरामजी लोखंडे | सदस्य |
| 8. | सौ. सुजाता विठ्ठलराव कोंबाडे | सदस्या |
| 9. | श्री. थूल राजू वासुदेवराव | सदस्य |
| 10. | श्री. हजारे पुरूषोत्तम नागोराव | सदस्य |
| 11. | श्री. गुडधे प्रफुल्ल विनोदराव | सदस्य |
| 12. | सौ.जैसवाल हर्षला संजय | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | सौ. कानतोडे भाग्यश्री गणेश | सदस्या |
| 2. | सौ. वानखेडे अनीता प्रदिप | सदस्या |
| 3. | सौ. प्रगती अजय पाटील | सदस्या |
| 4. | सौ.अलका अजय दलाल | सदस्या |

उपस्थित अधिकारी

1) श्री. आर.झेड.सिद्दीकी, उप निगम आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 124 :– वार्ड नं. 88, गॅस गोडाऊन ते डॉ. पोफळी आणि डॉ. संगतानी ते डॉ. मुकेश मिश्रा पर्यंत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदेमध्ये मे. आर. एम.गोपलानी यांची प्राकलनीय दरापेक्षा 17.50 टक्के कमी दराची रु.36,39,009/– ची निम्नतम निविदा प्राप्त आहे. या निविदेस तसेच रु. 44,10,920/– चे मुळ प्राकलनास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न दि. 17.04.2012 च्या समिती ठराव क्र. 15 अन्वये अर्थसंकल्प 2012–13 मनपा सभागृहाव्दारे मंजुर झाल्यावर नविन तरतुद (2012–13 ) प्रस्तावित करण्याबाबत मंजुरी प्रदान केली. त्या अनुषंगाने सदर्हु प्राकलन वर्ष 2012 – 13 च्या तरतुदीप्रमाणे मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन हा विषय कार्यालयास परत करण्यांस समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 125 :– नागपूर म.न.पा.च्या प्राथ., उच्च प्राथ. व माध्यमिक शाळेतील वर्ग 1 ते 8 मधील मुले 20263 + मुली 20516 एकूण 40779 विद्यार्थ्याकरीता गणवेष कापड खरेदी व शिलाई सत्र 2012 – 13 करीता सर्व शिक्षा अभियान अंतर्गत शासन निर्णय क्र. 2419 दिनांक 26 जून 2012 अन्वये एस. एम.सी. मार्फत शाळा स्तरावर होणार आहे.

उर्वरित माध्यमिक शाळेतील वर्ग 9 ते 12 मधील मुले 2700+ मुली 3300 एकूण 6000 विद्यार्थ्याकरीता प्रति विद्यार्थी दोन गणवेष या प्रमाणे गणवेषाचे कापड मुलांकरिता हाप शर्ट व मुलीकरीता कुर्ता (पायजामा) याकरीता पांढरे कापड 26500 मीटर, प्रति मीटर रु. 63/– प्रमाणे तसेच फुलपॅन्ट करीता खाकी कापड 7000 मीटर, प्रति रु. 149.40/– प्रमाणे तसेच सलवार करीता नेव्ही ब्लू कापड 19000 मीटर प्रति मीटर, रु. 63/– तसेच ओढणी करिता नेव्ही ब्ल्यु. नायलॉन कापड 15,000/– मिटर प्रति रु. 22.50/– प्रमाणे कापड खरेदी मा. प्रधान सचिव ( वस्त्रोद्योग विभाग ) मंत्रालय, मुंबई यांनी आदेशीत केलेल्या महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या. मुंबई यांचे कडून शासन दरानुसार खरेदी करण्यास तसेच गणवेष शिलाई महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादीत. नागपूर यांचे मंजूर दरानुसार करण्यास तसेच या अनुषंगाने कापड खरेदी व शिलाई करण्यास्तव येणाऱ्या रु. 51,45,600/– (अक्षरी – एक्कावन लक्ष पंचेचाळीस हजार सहाशे ) च्या खर्चास तसेच खरेदीस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 126 :– आरोग्य विभागातर्फे काढण्यात येणाऱ्या नाल्यावरील रेता/ गाळ/कचरा, तसेच सार्वजनिक जागांवर पडलेली माती/टाकाऊ बांधकाम साहित्य इत्यादी वजनाच्या आधारावर उचलून त्याची योग्य विल्हेवाट लावण्याच्या मागील निविदा संपुष्टात आल्या असल्याने त्याची नव्याने दोन वर्षासाठी निविदा मागवून दरकरार मान्य करण्यासाठी व यावर होणारा अंदाजीत वार्षिक खर्च रु.75 लक्ष पद क्र. 214 मधून किंवा इतर उपलब्ध प्रावधनामधून मागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 127 :– नागपूर महानगरपालिका सन 2012 – 2013 चे अंदाजपत्रका नुसार विविध झोनल पदांतर्गत कामाकरिता अर्थसंकल्पीय तरतुद एकूण रु. 622.39 लक्ष या राशीचे विविध झोनल पदांतर्गत मा. सदस्यांच्या सुचनेनुसार आवंटन प्रभाग समिती ठराव क्र. 9 दि. 27.7.2012 नुसार प्रस्तावित करण्यात आले आहे.

सदर पुनर्विनियोजन प्रस्तावास स्थायी समितीचे मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 128 :– सन 2012 – 2013 चे प्रभाग समितीचे अंदाजपत्रकात मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली. ( यात मंगळवारी झोन क्र. 10 चे अंदाजपत्रकातून एका प्रभागाचा लोकसंख्येचे प्रमाणात निधी वळता करण्याचा विषय अंतर्भूत आहे)

ठराव क्रमांक 129 :– नागपूर महानगरपालिका सन 2012 – 2013 चे अंदाजपत्रकानुसार विविध झोनल पदा अंतर्गत कामाकरिता अर्थ संकल्पीय तरतुद एकूण रु. 495.56 लक्ष या राशीचे विविध झोनल पदांअतर्गत मा. सदस्यांच्या सुचनेनुसार आंवटन करण्यात आले असुन झोन करीता एकूण प्राप्त रक्कमेत कोणतीच वाढ करण्यात आलेली नाही. करिता सन 2012–2.13 चे धंतोली झोन क्र. 4 चे झोनल पदांअतर्गत पुनर्विनियोजन (अ + ब ) प्रस्तावास प्रभाग समिती ठराव क्र.3 दि. 7.7.2012 रोजी दुपारी आवश्यक दुरुस्तीचे अधिकार मा. सभापती (प्र.स.) यांना प्रदान करुन या दुरुस्तीसह हा विषय मा. स्थायी समितीचे मंजुरी देण्याचा व नोंद घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 130 :– सन 2012 – 2013 चे सुधारीत झोनल अंदाजपत्रकास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

++ ++ ++

ठराव क्रमांक 131 :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

हस्ता /— हरीष दुबे

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

हस्ता /— दयाशंकर तिवारी

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर